MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १३ अंक : २ पाने : १२ फेब्रुवारी-मार्च २०१९ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

*प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,*

नवीन वित्तीय वर्षात आपण पर्दापण केलेले आहे. आपल्या सर्वांच्या हातभाराने गत वित्तीय वर्षात चांगली कामगिरी करण्यात आपल्याला यश आले. आता २०१९-२०२० या वर्षात सुद्धा आपण सर्व भरीव कामगिरी करून प्रगतीचा पुढील टप्पा गाठू, असा मला दृढ विश्वास आहे.

विद्युत क्षेत्रात तिमाही (एप्रिल, मे, जून) अतिशय महत्त्वाची आहे. या तिमाहीमध्ये सर्वात जास्त विजेची मागणी असते. त्याकरिता पारेषण प्रणाली सक्षमपणे हाताळणे गरजेची असते. मला अभिमान आहे की, वीज वहनाचा विक्रम आपण नोंदवत चाललेलो आहोत. परंतु, हे करीत असताना आपली यंत्रणेची सुस्थिती व देखभाल करण्यामध्ये कोणतीही उणीव आपण सोडता कामा नये. पारेषण प्रणालीची सुव्यवस्था व देखभाल संपूर्ण व्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा भाग ठरतो.

- पारेषण प्रणाली सक्षमपणे हाताळणे गरजेची
- यंत्रणेची सुव्यवस्था व देखभाल महत्त्वाची
- सततच्या पाठपुराव्यामुळे कामास गती
- गुणात्मक विकासासाठी प्रशिक्षण आवश्यक

आज आपण अनेक प्रकारे आपल्या सुव्यवस्था व देखभालीमध्ये सुधारणा करण्याच्या प्रयत्नात आहोत. Monkey patrolling पासून Drone based Patrolling वर कसे जाता येईल याच्या प्रयत्नात आपण आहोत. मला आशा आहे, या विषयात आधुनिकीकरण करण्यात कंपनीला चांगले यश येईल.

तसेच SLDC चे सबलीकरण करण्यात गतवर्षी आपण काही ठोस पाऊले उचलीत आणि यावर्षी सुद्धा आपण त्या दिशेने पाऊले टाकणार असून SLDC चे सबलीकरण जलद गतीने होण्यास मदत होईल. RE Visibility आणणे, SCADA Communication पूर्णपणे Integrate होणे DATA Real Time वर Upgradation अशा प्रकारे अनेक तांत्रिक प्रकल्प पूर्णत्वास येत आहेत. व्यवस्थापन MSLDC करिता ME/MTech in Power System झालेल्या अभियंत्यांना MSLDC पदस्थापना घेण्याकरिता प्रेरित करत आहोत. मला आशा आहे फार लवकरच MSLDC त्यांच्या सर्व Stake Holder ना अधिक तत्पर सेवा देण्यास यशस्वी होईल.

काळाची गरज ओळखता आज आपल्याला समाधानी होऊन चालणार नाही. अनेक क्षेत्रामध्ये सुधारणा करून व्यवस्थेला तत्पर व भक्कम बनविण्यात सर्वांनी हातभार लावणे गरजेचे आहे.

प्रकल्पांच्या कामामध्ये बऱ्याच अडचणी असतात. सर्व प्रकल्प त्या वेळेत, खर्चात व गुणवत्तेच्या कसोटीमध्ये खरे उतरून पूर्ण होणे कंपनीच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असते. सततचा पाठपुरावा, आढावा व नियंत्रणाने प्रकल्पाच्या कामास गती येते. प्रकल्पामध्ये अनेक वेळा कल्पकता व सचोटी कामास येते. अनेक जटील विषय कल्पकतेच्या जोरावर आपण नवीन आयाम देऊ शकतो. त्यातून आपले विषय मार्गी लावू शकतो.

सर्व जिल्ह्यांत महापारेषण यंत्रणेचे सातत्याने सक्षमीकरण व आधुनिकीकरण करण्यात येत आहे. तसेच या यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीची



**पराग जैन नानोटिया (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

कामे नियमितपणे नवे तंत्रज्ञान वापरून करण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्य किती मोठे आहे, याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. राज्याच्या वीजपुरवठ्यावर लक्ष ठेवणे आणि तो सुरळीत राहील, यासाठी पराकाष्ठा केली जात आहे; पण त्यात नवे तंत्रज्ञान वापरून सुधारणा करणे गरजेचे होते. ती प्रक्रिया आता वेगवान झाली पाहिजे.

कंपनी यावर्षी सुद्धा प्रशिक्षणाच्या मुबलक संधी उपलब्ध करून देणार आहे. मला आशा आहे, आपण सर्व गुणात्मक विकास करण्याकरिता प्रशिक्षणाचा चांगला उपयोग करणार. अशी धारणा आहे की, प्रशिक्षणामुळे आपल्याला नवीन दिशा मिळते. तसेच ज्ञानात भर पडते. त्यामुळे आपण अधिक कार्यकुशल होऊन आपले मनोबल उंचावतो. मला आशा आहे की, आपण सर्व २०१९-२०२० या वर्षात कंपनीला यशाच्या पुढच्या पायरीवर घेऊन जाण्याकरिता मला सहकार्य कराल.

**शुभेच्छांसह..!**

**- पराग जैन नानोटिया**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**नागपूर :** महाऊर्जाच्या १३ व्या राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन व व्यवस्थापन पुरस्कार वितरण समारंभाचे उदघाटन करताना केंद्रीय महामार्ग वाहतूक, जहाजबांधणी व गंगाशुध्दीकरण मंत्री श्री. नितीन गडकरी. शेजारी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, आ. सुधाकर कोहळे, ब्युरो ऑफ एनर्जी इफिशिएन्सीचे महासंचालक श्री. अभय बाकरे, महाऊर्जाचे महासंचालक श्री. कांतीलाल उमाप.

## राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन व व्यवस्थापन पुरस्कार समारंभ

# कचऱ्यापासून वीज निर्मितीपेक्षा इंधन तयार करावे : नितीन गडकरी

*टीम महापारेषण/टीम महाऊर्जा*

अपारंपरिक ऊर्जेचे दिवसेंदिवस स्वस्त होणारे दर पाहता कचऱ्यापासून वीज निर्मिती ऐवजी आता कचऱ्यापासून इंधन निर्मितीचा पर्याय चांगला आहे. त्यापासून चांगले उत्पन्न मिळू शकते. शेतातील निरुपयोगी वस्तू व कचऱ्यापासून शेतकरीही आता जैव इंधन, जैव प्लास्टिक बनवू शकतो, असे प्रतिपादन केंद्रीय महामार्ग वाहतूक, जहाजबांधणी व गंगाशुध्दीकरण मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी केले.

महाऊर्जाच्या १३ व्या राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन व व्यवस्थापन पुरस्कार वितरण समारंभात विशेष अतिथी म्हणून श्री. नितीन गडकरी बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जामंत्री तसेच महाऊर्जाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर बावनकुळे, आ. सुधाकर कोहळे, ब्युरो ऑफ एनर्जी इफिशिएन्सीचे महासंचालक श्री. अभय बाकरे, महाऊर्जाचे महासंचालक श्री. कांतीलाल उमाप, अति. महासंचालक श्री. पुरुषोत्तम जाधव उपस्थित होते.

श्री. गडकरी पुढे म्हणाले, ``इथेनॉलवर बसेस चालविण्याचा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर आता मिथेनवर बसेस चालणार आहेत. बॉयोफ्यूएलमुळे शेतकऱ्यांचा ट्रॅक्टरही चालण्याची चाचणी यशस्वी झाली आहे. सांडपाणी वीजनिर्मिती केंद्राला देऊन वीजनिर्मिती करण्याचा प्रयोग नागपुरात यशस्वी झाला. सांडपाण्यापासून महापालिकेला ७९ कोटी रुपये मिळत आहे. वीजनिर्मितीसाठी असलेल्या शुध्द पाण्याचे आरक्षण आता राहणार नाही, ते पाणी आता पिण्यासाठी उपयोगात येणार आहे. महानगरपालिकांनी आता कचऱ्यापासून बायो सीएनजी तयार करावा आणि महाऊर्जाने त्यासंदर्भातील धोरण तयार करावे. धानाच्या तणसापासून बायो सीएनजी तयार आम्ही केला आहे. त्यावर ट्रॅक्टर चालतो. यामुळे एका शेतकऱ्याला ५० ते ६० हजार रुपये फायदा होऊ शकतो. पाच टन तणसापासून एक टन सीएनजी निघते. नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात धान उत्पादन होते. हे चारही जिल्हे इंधनाचा हब होऊ शकतात.``

सौरऊर्जा तयार करणारे पॅनेल हे विदेशातून येतात. विदेशी पॅनेलची टिकण्याची हमी अधिक असते. पण देशातच चांगल्या प्रतीचे पॅनेल तयार झाले तर सौरऊर्जा निर्मितीचा दर आणखी कमी होईल. स्वस्त सौरऊर्जा निर्मिती शक्य होणार आहे. जैव तंत्रज्ञानाचा वापर करून इंधन निर्मितीचे धोरण शासनाने आणावे, अशी सूचनाही गडकरींनी यावेळी केली. बांबूपासूनही तेल निर्मिती शक्य असल्यामुळे शेतकरी व आदिवासींनी बांबूपासून तेल निर्मिती करता येऊ शकते, असेही ते म्हणाले.

महाऊर्जाचे महासंचालक श्री. कांतीलाल उमाप यांनी प्रास्ताविक भाषणात महाऊर्जाच्या कार्याचा आढावा घेतला. शालेय गटात घेण्यात आलेले विविध पुरस्कारांचे वितरण केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी व ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. ऊर्जा संवर्धनाच्या क्षेत्रात ज्या कंपन्यांनी ऊर्जा बचत करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे, हे सर्व संस्था व कंपन्यांना पुरस्काराने गौरवान्वित करण्यात आले.

### ऊर्जामंत्र्यांचे गडकरींकडून कौतुक

यावेळी केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कामाचे कौतुक केले. शेतकऱ्यांना सौर कृषी पंप देणे, शेतकऱ्यांना सौर वीज वाहिनीतून वीज देणे या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. सौर ऊर्जेच्या विविध योजना आज महाराष्ट्रात बावनकुळे यांच्यामुळेच सुरु होत आहेत, असेही ते म्हणाले.



## हॉटलाईन मेंटेनन्स तंत्रज्ञानाचे फायदे

वाहिनी खंडित न करता वीजपुरवठा सुरु ठेवणे शक्य



'V' for Victory..!




**औरंगाबाद :** नाट्यस्पर्धेच्या विजेत्यासमवेत महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं. आस्थापना) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, श्री. सुरेश गणेशकर, अविनाश कोंडावार व अन्य.

## वाशीचे 'असं कधी होत नाही' प्रथम ; नागपूरचे 'फतवा' नाटक व्दितीय

# औरंगाबादमध्ये आंतरपरिमंडळीय नाट्यस्पर्धा उत्साहात

***टीम महापारेषण, औरंगाबाद***

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या २०१८-२०१९ वर्षाकरिता अउदा बांधकाम नि संवसु औरंगाबाद परिमंडळ आयोजित आंतरपरिमंडळीय नाट्यस्पर्धा उत्साहात झाल्या. नाट्यस्पर्धेचे आयोजन परिमंडळाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील नाट्यगृहामध्ये केले होते.

नाट्यस्पर्धेचे उदघाटन महावितरणचे औरंगाबाद परिमंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. ओमप्रकाश बकोरिया यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून महावितरण औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. सुरेश गणेशकर उपस्थित होते. याप्रसंगी औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता सर्वश्री अविनाश कोंडावार, अधीक्षक अभियंता संदीप हाके, महेंद्र वाळके, अनिल भारसाकळे, श्यामकांत वसेकर, कराड परिमंडळाचे अधीक्षक अभियंता रंगनाथ चव्हाण, अविनाश निंबाळकर, बिभीषण निर्मळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) (प्रभारी) चंद्रशेखर बोराडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) प्रवीण यशवंते उपस्थित होते.

नाट्यस्पर्धेची सुरूवात औरंगाबाद परिमंडळाच्या 'अडगळ' या नाटकाने झाली. नागपूर परिमंडळाचे 'फतवा' हे नाटक सादर केले. नाशिक परिमंडळाचे 'उत्तरदायित्व', पुणे परिमंडळाचे 'डिल दा मॉमला', कराड परिमंडळाचे 'स्टेलमेट', वाशी परिमंडळाचे 'असं कधी होत नाही', सांघिक कार्यालयाचे 'शोभायात्रा', अमरावती परिमंडळाचे 'जांभूळवाटी' अशी अप्रतिम नाटकं सादर करण्यात आली. नाट्यस्पर्धेच्या दरम्यान 'मुजरा महाराष्ट्राचा' हा लोकगीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यानंतर 'सूर नवा ध्यास नवा' फेम सक्षम सोनवणे याच्या गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले.

नाट्यस्पर्धेत वाशी परिमंडळाचे 'असं कधी होत नाही' नाटकाने प्रथम क्रमांक, नागपूर परिमंडळाच्या 'फतवा'ने व्दितीय क्रमांक पटकाविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील नाट्य विभागप्रमुख श्री. जयंत शेवतेकर व श्रीमती जयश्री कुलकर्णी यांनी नाट्यस्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. नाट्यस्पर्धेच्या समारोपप्रसंगी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (वित्त) श्री. विनायक साठे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं. आस्थापना) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन व्यवस्थापक (मा.सं.) श्री. विलास कोल्हे व श्री. सचिन भोई यांनी केले. नाट्यस्पर्धा आयोजन समितीचे सचिव व अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. संदीप हाके यांनी आभार मानले.

■ शेतकरी, गरीब, महिला यांच्यासाठी तरतूद ■

# सर्वांना दिलासा देणारा अर्थसंकल्प : ऊर्जामंत्री

■ *टीम महापारेषण, मुंबई*

राज्यातील शेतकरी, गरीब, महिला, बेरोजगार, शासकीय कर्मचारी व मध्यमवर्गीयांना दिलासा देणारा राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सादर केला असल्याची प्रतिक्रिया राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली. `सबका साथ, सबका विकास` करणारा हा अर्थसंकल्प असल्याचेही मत त्यांनी व्यक्त केले.

टंचाई व दुष्काळग्रस्तांसाठी दोन हजार कोटींचा नियतव्यय करण्यात आला. सिंचनासाठी आठ हजार ७३३ कोटींचा नियतव्ययामुळे विदर्भ, मराठवाडा व शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांना दिलासा मिळणार आहे.

कृषी विभागाला विविध योजनांसाठी साडेतीन हजार कोटी कृषीपंपाना वीज जोडणीसाठी ९०० कोटी, कृषी ग्राहकांना वीज दरात सवलतीसाठी पाच हजार २१० कोटी रूपयांची नियतव्ययाची



तरतूद राज्याचे वीजक्षेत्र मजबूत करणारी आहे. याशिवाय महिलांसाठी, शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग, दारिद्र्यरेषेवरील कुटुंबाना स्वस्त धान्य, सामाजिक कार्यक्रमाअंतर्गत विविध योजनांवर जी तरतूद करण्यात आली, त्यावरून अर्थमंत्र्यांनी या अंदाजपत्रातून गोरगरीब, मागासवर्गीय अशा सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगून ऊर्जामंत्र्यांनी या अंतरिम अर्थसंकल्पाचे स्वागत करीत असल्याचे म्हटले आहे.



## महापारेषणच्या संचालक (संचलन)पदी श्री. संजय ताकसांडे

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या संचालक (संचलन) पदी श्री. संजय ताकसांडे हे दि. १ एप्रिल २०१९ रोजी रूजू झाले. महापारेषणमध्ये रूजू होण्यापूर्वी श्री. ताकसांडे हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीत (महावितरण) पुण्यामध्ये प्रादेशिक संचालक म्हणून कार्यरत होते. तसेच त्यांनी यापूर्वी महावितरणमध्ये अमरावती परिमंडलात मुख्य अभियंता म्हणून काम केले आहे. त्यानंतर महावितरणच्या सांघिक कार्यालय, मुंबई येथे कार्यकारी संचालक (वितरण) म्हणून काम केले. श्री. ताकसांडे यांना वीज क्षेत्रात महत्त्वाच्या पदांवर काम केल्याचा २९ वर्षांचा मोठा अनुभव आहे. केंद्र सरकारच्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण व पॉवरग्रीड कार्पोरेशनमध्ये त्यांनी काम केले आहे. त्यांना पारेषण आणि वितरण क्षेत्रात असलेल्या अनुभवाचा महापारेषणला चांगला फायदा होणार आहे. महापारेषणच्या वतीने त्यांच्या पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा.

## थेट-भेट





**मुंबई :** संरक्षण मंत्रालयाच्या राष्ट्रीय सुरक्षा महाविद्यालय, नवी दिल्ली येथील शिष्टमंडळाने महाराष्ट्रातील वीज क्षेत्रांतील कार्याचा आढावा घेण्यासाठी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. अरविंद सिंह, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, `मेडा`चे महासंचालक श्री. कांतीलाल उमाप, संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे यांच्यासह अन्य मान्यवर.



## *हॉटलाईन मेंटेनन्स तंत्रज्ञानाचे फायदे*

आर्थिक नुकसान नाही ; वीजपुरवठा सुरळीत ठेवणे शक्य





**ओरोस (जि. सिंधुदुर्ग) :** येथे आयोजिलेल्या विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनच्या १९ व्या व्दिवार्षिक महाअधिवेशनाचे उदघाटन करताना महावितरणचे संचालक (प्रकल्प) श्री. भालचंद्र खंडाईत. शेजारी महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, संघटनेचे अध्यक्ष श्री. रवी बारई, मुख्य अभियंता श्रीमती रंजना पगारे, संघटनेचे सरचिटणीस श्री. आर. टी. देवकांत यांच्यासह संघटनेचे अन्य पदाधिकारी.

## रक्तदान शिबिरात दोनशे जणांचा सहभाग

# ओरोस येथे तांत्रिक कामगार युनियनचे महाअधिवेशन उत्साहात

*टीम महापारेषण, सिंधुदुर्ग*

ओरोस (जि. सिंधुदुर्ग) येथे आयोजिलेल्या विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनच्या १९ व्या व्दिवार्षिक महाअधिवेशनाचे उदघाटन महावितरणचे संचालक (प्रकल्प) श्री. भालचंद्र खंडाईत यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष श्री. रवी बारई होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महावितरणच्या कोकण विभागाच्या मुख्य अभियंता श्रीमती रंजना पगारे महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील उपस्थित होते.

याप्रसंगी व्यासपीठावर संघटनेचे सरचिटणीस श्री. आर. टी. देवकांत, उपाध्यक्ष श्री. गजानन सुपे, श्री. प्रवीण पाटील, श्री. नितीन पवार, श्री. बाळासाहेब गायकवाड, श्री. उत्तम रोकडे, श्री. हरिराम गिते, श्री. संतोष घाडगे, श्री. रवी वैद्य, श्री. शैलेश पेंडसे, श्री. राम चव्हाण, श्री. माणिक बेळगुंपे उपस्थित होते.

रिस्ट्रक्चरिंगमध्ये कोणतीही पदे कमी होणार नाहीत, असे महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे सांगितले. यावेळी स्मरणिका, `तांत्रिक जन्मगाथा`चे प्रकाशन तसेच संघटनेच्या मोबाईल ॲपचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी घेण्यात आलेल्या रक्तदानात शिबिरात दोनशे जणांनी सहभाग नोंदविला. प्रास्ताविक श्री. हरिश्चंद्र गुजर यांनी केले तर आभार श्री. संतोष घाडगे यांनी मानले.



**घारगाव :** अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यामध्ये प्रलंबित १३२/३३ के. व्ही. उपकेंद्र, घारगाव व १३२ के. व्ही. आळेफाटा-घारगाव या वाहिन्या कार्यान्वित करण्यात आल्या. याप्रसंगी अधिकारी व कर्मचारी वर्ग.

### संगमनेर तालुक्यात योग्य दाबाने पाणीपुरवठा होणार

# १३२/३३ के. व्ही. घारगाव उपकेंद्र कार्यान्वित

*टीम महापारेषण, नाशिक*

अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यामध्ये प्रलंबित १३२/३३ के. व्ही. उपकेंद्र, घारगाव व १३२ के. व्ही. आळेफाटा-घारगाव या वाहिन्या कार्यान्वित करण्यात आल्या. यामुळे संगमनेर तालुक्यातील घारगाव, आळेफाटा, साकूर, खर्जुल पठार, बोटा, माळवाडी या गावांना योग्य दाबाने वीजपुरवठा होणार आहे.

या उपकेंद्राचे काम मे. जी. ई. टी. एन्ड डी. इंडिया लिमिटेड व वाहिनीचे काम व्हेरोनिका इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीमार्फत करण्यात आली आहेत.

याप्रसंगी मुख्य अभियंता सर्वश्री जयंत वीके, अधीक्षक अभियंता प्रवीण भालेराव, अधीक्षक अभियंता किशोर जाधव, अधीक्षक अभियंता (प्रभारी) दीपक पाटील, कार्यकारी अभियंता (प्रभारी) कुंदन पवार, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) विनोद ढोरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता आशुतोष जाधव, अतिरिक्त कार्यकारी अभियंता मिलिंद भामरे उपस्थित होते.

### पारनेर तालुक्यात योग्य दाबाने पाणीपुरवठा होणार

# १३२ के. व्ही. वडझिरे उपकेंद्र कार्यान्वित

*टीम महापारेषण, नाशिक*

अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यामध्ये प्रलंबित १३२ के. व्ही. उपकेंद्र, वडझिरे व लिलो वाहिनी १३२ के. व्ही. सुपा-शिरूर वडझिरे उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले. यामुळे पारनेर तालुक्यातील वडझिरे, आळकुटी, बाभूळपाडा, निघोज, चिंचोली, देविभोइरे या गावांना योग्य दाबाने वीजपुरवठा होणार आहे.

या उपकेंद्राचे काम मे. आयडियाज इंजिनिअर लिमिटेड व वाहिनीचे काम मे. इमिनन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीमार्फत करण्यात आले आहे. याप्रसंगी मुख्य अभियंता सर्वश्री जयंत वीके, अधीक्षक अभियंता प्रवीण भालेराव, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) शरद लोखंडे, अधीक्षक अभियंता (प्रभारी) दीपक पाटील, अधीक्षक अभियंता (प्रभारी) किशोर जाधव, कार्यकारी अभियंता (प्रभारी) कुंदन पवार, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) विनोद ढोरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता ओमप्रकाश राजगुरु, अतिरिक्त कार्यकारी अभियंता मिलिंद भामरे उपस्थित होते.




**अहमदनगर :** अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यामध्ये प्रलंबित १३२ के. व्ही. उपकेंद्र, वडझिरे व लिलो वाहिनी १३२ के. व्ही. सुपा-शिरूर वडझिरे उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले. याप्रसंगी अधिकारी व कर्मचारी वर्ग.



## हॉटलाईन मेंटेनन्स तंत्रज्ञानाचे फायदे

वाहिनीची उपलब्धता व विश्वासार्हता वाढते



थेट-भेट

■ तांत्रिक बाबींची घेतली माहिती ■

# वीज नियामक आयोगाच्या सदस्यांची पडघेला भेट

■ *टीम महापारेषण, वाशी*

महापारेषणच्या पडघे येथील उच्चदाब व्दिष्टधारा प्रकल्पाला महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाचे सदस्य व अधिकाऱ्यांनी भेट दिली. उच्चदाब व्दिष्टधारा (HVDC) प्रकल्पाची माहिती, कामकाजाची पद्धत EHV AC व HVDC यामधील तांत्रिक बाबींची माहिती घेतली.

यावेळी आयोगाचे सदस्य श्री. मुकेश खुल्लर, सचिव श्री. अभिजित देशपांडे, आयोगाचे संचालक (विद्युत अभियांत्रिकी) श्री. प्रफुल्ल वऱ्हाडे, संचालक (वीजदर) श्री. घनश्याम पाटील, उपसंचालक (तांत्रिक) श्री. पोपट खंदारे, उपसंचालक (तांत्रिक) श्री. बाळू डगले, महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, महावितरणचे संचालक श्री. सतीश चव्हाण उपस्थित होते.

याप्रसंगी महापारेषणचे अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री यांनी AC व DC Switchyard बद्दलची माहिती देऊन तांत्रिक बाजू सांगितली. यावेळी सांघिक कार्यालयातील मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर, मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. सतीश गहेरवार, अधीक्षक अभियंता श्री. जगन्नाथ चुडे, श्री. भूषण बल्लाळ यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**पडघे :** महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या सदस्य व अधिकाऱ्यांनी उच्चदाब व्दिष्टधारा प्रकल्पाला भेट दिली. याप्रसंगी माहिती देताना अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री.

सर्वांसाठी वीज



**आलापल्ली (जि. गडचिरोली) :** येथे १३२ के. व्ही. उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले. याप्रसंगी अधिकारी व कर्मचारी.

■ वीजपुरवठा सुरळीत होणार ■

# आलापल्ली येथे १३२ के. व्ही. उपकेंद्र कार्यान्वित

■ *टीम महापारेषण, नागपूर*

आलापल्ली जि. गडचिरोली येथे १३२ के. व्ही. उपकेंद्र सुरळीतपणे कार्यान्वित करण्यात आले. यामुळे अहेरी, चामोर्शी, सिरोंचा तालुक्यातील गावांना वीजपुरवठा सुरळीत होणार आहे.

आलापल्ली येथे यापूर्वी ६६ के. व्ही. उपकेंद्र व ६६ के. व्ही. आष्टी ते आलापल्ली एकच वीजवाहिनी असल्यामुळे वारंवार अतिरिक्त भारनियमनाचा प्रश्न होता. त्यामुळे १३२ के. व्ही. उपकेंद्रास मुख्य कार्यालयांकडून परवानगी मिळाली होती.

या कामासाठी महापारेषणचे मुख्य अभियंता सर्वश्री सुरेशकुमार पाटील, अधिक्षक अभियंता अविनाश निंबाळकर, अधिक्षक अभियंता (स्थापत्य) प्रवीण दामके, कार्यकारी अभियंता किशोर भोयर, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) प्रवीण पिल्लेवान, अति. कार्यकारी अभियंता गणेश कुकडे, अति. कार्यकारी अभियंता (स्थापत्य) रोहित रामटेके यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सर्वांसाठी वीज

■ रावेर तालुक्यात योग्य दाबाने पाणीपुरवठा होणार ■

# २२०/१३२ के. व्ही. विरोदा उपकेंद्र कार्यान्वित

■ *टीम महापारेषण, नाशिक*

जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यामध्ये २२०/१३२ के. व्ही. उपकेंद्र विरोदा व २२० के. व्ही. दीपनगर-अमळनेर वाहिनी, १३२ के. व्ही. विरोदा-सावदा वाहिनी, १३२ के. व्ही. विरोदा-यावल या वाहिन्या कार्यान्वित करण्यात आल्या. यामुळे परिसरातील गावांना योग्य दाबाने वीजपुरवठा होणार आहे.

यामुळे जळगाव जिल्ह्यातील महापारेषणच्या वाहिन्यांचे मजबुतीकरण झाले आहे. उपकेंद्राचे काम मे. वरसाना इस्पात लि. व वाहिन्यांची कामे मे. बीएनसी कंपनीमार्फत करण्यात आली आहेत. याप्रसंगी मुख्य अभियंता सर्वश्री जयंत वीके, अधीक्षक अभियंता प्रवीण भालेराव, अधीक्षक अभियंता (प्रभारी) दीपक पाटील, अधीक्षक अभियंता (प्रभारी) योगेश चव्हाण, कार्यकारी अभियंता मोहन महाजन, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) सुमंत मुंडे, कार्यकारी अभियंता (प्रभारी) सचिन चित्ते, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुनील पवार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता पंकज तळेले, अतिरिक्त कार्यकारी अभियंता अजय नारखेडे उपस्थित होते.



**विरोधा, जळगाव** : रावेर तालुक्यामध्ये २२०/१३२ के. व्ही. उपकेंद्र विरोदा व २२० के. व्ही. दीपनगर-अमळनेर वाहिनी, १३२ के. व्ही. विरोदा-सावदा वाहिनी, १३२ के. व्ही. विरोदा-यावल या वाहिन्या कार्यान्वित करण्यात आल्या. याप्रसंगी अधिकारी व कर्मचारी वर्ग.

शिक्षण-प्रशिक्षण

■ कामकाजात गुणात्मक वाढ होणार ■

# पडघे येथे महिला सक्षमीकरण प्रशिक्षण

■ *टीम महापारेषण, प्रशिक्षण*

महापारेषण कंपनीतील वर्ग ३ व ४ च्या महिला कर्मचाऱ्यांच्या व्यक्तिमत्त्वात व कामकाजात गुणात्मक वाढ व्हावी, या उद्देशाने कंपनीने शक्ती या महिला सक्षमीकरणाच्या विशेष प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. या प्रशिक्षणाची सुरूवात प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, पडघा येथून झाली.

शक्ती हे प्रशिक्षण देण्यासाठी इंडियन स्कूल ऑफ इंटेग्रेटेड लर्निंग या संस्थेकडून श्रीमती भाग्यश्री घोसाळकर आणि श्रीमती सोनाली थिटे प्रशिक्षिका म्हणून उपस्थित होत्या.

प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी सांगता समारंभासाठी महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे प्रशिक्षणार्थ्यांचे अभिप्राय जाणून घेण्यासाठी उपस्थित होते.



## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे फेब्रुवारी-मार्च २०१९

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीकांत सदाशिव राजूरकर | मुख्य अभियंता | सांघिक कार्यालय | २८.०२.२०१९ |
| २. | सतीश विठ्ठलशीव गहेरवार | अधीक्षक अभियंता | अउदा, संवसु मंडल, पनवेल | ३१.०३.२०१९ |
| ३. | अरविंद सदाशिव गव्हाणकर | उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) | सांघिक कार्यालय | २८.०२.२०१९ |

Women Power

■ मुख्य अभियंता श्री. सचिन तालेवार यांची अपेक्षा ■

# विजेच्या क्षेत्रातही महिला उत्तम कामगिरी बजावतील

■ *टीम महापारेषण/टीम महावितरण, पुणे*

'महावितरण, महापारेषणमध्ये महिला अभियंता व कर्मचारी वीजमीटर जोडण्यांपासून ते टॉवरलाइनच्या देखभाल व दुरूस्तीचे सर्व तांत्रिक कामे अतिशय कौशल्याने व आत्मविश्वासाने करीत आहेत. संधी मिळाल्यास वीजक्षेत्रातसुद्धा महिला महत्त्वाची व उल्लेखनीय कामगिरी बजावू शकतात हे यावरून दिसून येते', असे मत महावितरणचे मुख्य अभियंता श्री. सचिन तालेवार यांनी व्यक्त केले.

रास्ता पेठ येथील कार्यालयात जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमात श्री. तालेवार बोलत होते. या वेळी महापारेषणचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. वंदनकुमार मेंढे, अधीक्षक अभियंता श्री. राजेंद्र पवार, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. राजेंद्र म्हंकाळे, प्रशांत चौधरी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. रामगोपाल अहिर उपस्थित होते. महावितरणमधील महिला क्रीडापटू निशा पाटील, अनिता कुलकर्णी, कमलरूख दारूखानवाला, अंकुर ठाकूर, वर्षा बोपटे, वैष्णवी गांगरकर, ऋतुजा तारे, अश्विनी जाधव, अनिता सोनेरी, शीतल नाईक, सायली कचरे, संगीता देशमुख, माया येलवंडे तसेच महापारेषणमधील नाट्यकलावंत स्नेहल चौरे, पूजा शिंदे, मधुश्री खाटपे यांचा गौरव करण्यात आला.

जयश्री शेलोकर यांनी सूत्रसंचालन केले. रोहिणी पाटसकर यांनी आभार मानले.




**पुणे :** जागतिक महिला दिनानिमित्त शपथ घेताना महिला व वरिष्ठ अधिकारी वर्ग.

नारीशक्तीला सलाम!

■ महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन ■

# औरंगाबाद परिमंडळात महिला दिन उत्साहात

■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*

महापारेषण कंपनीच्या परिमंडळात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अधीक्षक अभियंता सर्वश्री महेंद्र वाळके, अधीक्षक अभियंता श्यामकांत वसेकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) (प्रभारी) चंद्रशेखर बोराडे, कार्यकारी अभियंता विवेक कानडे यांच्यासह महिला अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सुरुवातीला श्री. महेंद्र वाळके, श्री. श्यामकांत वसेकर, श्री. चंद्रशेखर बोराडे, श्री. विवेक कानडे यांनी परिमंडळातील उपस्थित सर्व महिला कर्मचाऱ्यांना जागतिक महिला दिनाबद्दल शुभेच्छा देऊन आपले मनोगत व्यक्त केले. परिमंडळातील महिला कर्मचारी श्रीमती कल्याणी कुरकुटे यांनी जागतिक महिला दिनाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी महिला कर्मचाऱ्यांसाठी सांघिकतेच्या दृष्टीने समूह खेळांचे आयोजन करण्यात आले

मुख्य अभियंता श्री. अविनाश कोंडावार, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. चंद्रशेखर बोराडे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सूत्रसंचालन वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं) श्रीमती मंजुषा दुसाने यांनी केले.



**औरंगाबाद :** जागतिक महिला दिनी बोलताना श्रीमती कल्याणी कुरकुटे. व्यासपीठावर सर्वश्री महेंद्र वाळके, श्यामकांत वसेकर, चंद्रशेखर बोराडे, विवेक कानडे व श्रीमती मंजुषा दुसाने.



## *हॉटलाईन मेंटेनन्स तंत्रज्ञानाचे फायदे*

प्रतिबंधक उपाययोजना करणे शक्य



शिवजयंती

■ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

# छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती `महापारेषण`मध्ये उत्साहात

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) छत्रपती शिवाजी महाराज यांची ३८९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी सुरूवातीला संचालक (संचलन) श्री. गणपत मुंडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. संजय कुमार, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. मोतीसिंह चौहान, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, कार्यकारी अभियंता श्री. सचिन खडगी, शिष्टाचार अधिकारी श्री. सतीश जाधव यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. महेंद्र वाळके यांनी केले.

जय शिवराय



■ सुमारे २५० जणांनी घेतला उपचार ■


# नाशिक येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर



**नाशिक :** सह्याद्री हॉस्पिटलच्या वतीने नाशिक परिमंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.


■ *टीम महापारेषण, नाशिक*

सह्याद्री हॉस्पिटलच्या वतीने नाशिक परिमंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये सुमारे २५० जणांनी लाभ घेतला. यामध्ये बीएमआय इंडेक्स, ब्लड प्रेझर, शुगर लेव्हल, ईसीजी आदी चाचण्या घेण्यात आल्या. शिबिरासाठी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत वीके, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. प्रमोद गोडसे यांनी पुढाकार घेतला.



*हॉटलाईन मेंटेनन्स तंत्रज्ञानाचे फायदे*

संभाव्य बिघाडांची आधीच दुरूस्ती करणे शक्य



# सशक्त नारी



चल, उठ तू वज्रमूठ करूनी,
का असतेच आसवे गाळूनी,
तुझ्यापाशी आहे वारसा व घरंदाजपणा
जिजाऊ, रमाई व अहिल्येचा...
तरीपण तू सतत का राहतेस भग्नावशेषासारखी
भूतकाळ-भविष्य, चूक-भूल, दोष-अपराध या मती नियतीशी
तू आहेस, या शतकातील सर्व सामर्थ्यवान नारी
कोणकोणत्या क्षेत्रात तू नाहीस, जरा बघ निरखून
कधी कल्पना, कधी किरण, कधी स्वाती,
कधी उषा तर कधी सिंधू
सतत आहेत तुझ्यासोबत सगेसंगती
तुला कोण-कोण फसवत आहे सतत,
यांची पर्वा तू उर्मी बाळगू नकोस,
होईल सर्व जमा-खर्च या भूतलावरती
तू आहेस सशक्त नारी या जन्मी
नको दोष किंवा जय-पराजयाची भाषा
नकोच नुसती नाती-गोती, नकोच नुसती कोरडी वाणी
नकोच ती निंदा-नालस्ती
कारण कधी तू माता-भगिनी तर कधी रणरागिनी
आयुष्यात कधी जीवनसाथी लाभो किंवा नको,
त्यांची खंत किंवा चिंता न करूनी,
पर्वा कर नव्या विचारांची तर कधी नव्या स्वप्नांची...
तू, पुन्हा-पुन्हा, वारंवार साद घाल स्वतःला
घे उंच झेप आकाशी, नवे-नवे, क्षितीजे ओलांडूनी
म्हणून उठ कर वज्रमूठ हाताची घडव,
नव्या शतकातील नवी नारी...

रचना-पारस पां.सवाई
व्यवस्थापक, मानव संसाधन,
सांघिक कार्यालय, मुंबई

# शिस्त : यशस्वी होण्याचा राजमार्ग


कोणत्याही कार्यालयामध्ये शिस्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कार्यालयीन कामकाजानुसार शिस्तीचे स्वरूप बदलत असते. ज्या कंपनीमध्ये ग्राहकांना निरनिराळ्या सेवा उपलब्ध करून दिल्या जातात, त्या कंपनीमध्ये ग्राहकांना दिलेल्या वेळा काटेकोरपणे पाळणं महत्त्वाचं असतं. अन्यथा, ग्राहक पर्यायी सेवेचा, काही वेळा स्पर्धक कंपनीचाही विचार करतात. तसंच ज्या कंपनीमध्ये उत्पादन केलं जातं, त्या कंपनीने जर कामामध्ये शिस्त पाळली नाही, तर योग्य वेळी उत्पादन उपलब्ध होणं अवघड होऊ शकतं.

कंपनीतील सर्व कर्मचाऱ्यांना शिस्त लावण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असते. शिस्तबद्ध पध्दतीने कामकाज केल्यानेच कंपनीच्या कार्यपद्धतीमध्ये कुशलता येऊन कंपनीची कार्यसंस्कृती रूजविण्यामध्ये मोलाचे योगदान ठरते. शिस्त ही एका दिवसात किंवा लगेचच लावता येते, असं नाही. त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. अगदी बारीक-सारीक बाबींचे नियोजन करून त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी लागते.

वास्तविक पाहता शिस्तीची सुरुवात बालपणापासून होते. त्यानंतर ती आपल्या एकंदरीत जडणघडणींवरून पक्की होत असते. शिस्तबद्ध काम याचा अर्थ काम करण्याची योग्य पद्धती. वेगवेगळ्या कंपनीमध्ये आधुनिक काम करण्याची एक विशिष्ट पद्धती असते. अशी पद्धती जर कर्मचाऱ्याने अमलात आणली नाही, तर त्याला कामच करता येणार नाही. कार्यालयीन कामकाजामध्ये लागणारी अचूकता अपेक्षित नाही आणि गरजेचीही नाही. तथापि, विशिष्ट पद्धत ठरवून, ठरविलेल्या क्रमानेच काम केले असता ते व्यवस्थित होतं; तसंच अशा प्रकारे काम केल्याने काम केल्याचं समाधान मिळतं. कार्यक्षम कर्मचारी होण्यासाठी शिस्तबद्ध कामाची सवय असणं क्रमप्राप्त असतं. कार्यालयीन कामकाजानुसार आणि कामाच्या व्याप्तीनुसार काम करण्याच्या पद्धतीत बदल होत असतो. यामुळे शिस्तबद्धकामाचं सार्वजनिकीकरण होणे शक्य नाही.

काही कर्मचारी हातात आलेले काम विनाविलंब पूर्ण करतात. ते काम चांगलेही करतात; परंतु त्यांच्या कामात सुसंगती दिसून येत नाही; तसंच विशिष्ट कामाची निकड लक्षात घेऊन कामांचा अग्रक्रम ठरवून काम करावे लागते. अन्यथा, महत्त्वाची व तातडीची कामे अर्धवट राहू शकतात आणि कमी महत्त्वाची किंवा तुलनात्मक कमी दर्जाची कामं अनावश्यक वेळेआधी पूर्ण होतात. काही कर्मचाऱ्यांच्या टेबलवर काही फाइल्स उघड्या दिसतात. काही कागदपत्रे बाजूला पडलेली असतात. त्याच वेळी संगणकावर दुसरीच कुठली तरी फाइल उघडून ठेवलेली असते. त्याच वेळी नवीन कामासंबंधी बैठक सुरू असते. असं चित्र बऱ्याच कार्यालयांमध्ये पाहायला मिळतं. असे कर्मचारी शिस्तीचे पालन करताना दिसत नाहीत; तसंच काम पूर्ण झाल्याचे मानसिक समाधानही ते हिरावून बसतात; कारण इतर अपूर्ण पडलेल्या कामांमुळे ते अस्वस्थ राहतात.

शिस्तीचे पालन न करण्याचे वर उल्लेख केलेले व अन्यही काही दुष्परिणाम टाळण्यासाठी बालवयातच शिस्त लागणे गरजेचं असतं. या संदर्भात पालकांना व शालेय शिक्षकांना महत्त्वाची भूमिका बजावणं अपेक्षित आहे. पाल्यांना शिस्तीचे महत्त्व पटवून देऊन त्यांना न दुखावता शिस्तबद्ध वर्तन करायला भाग पाडण्यातच पालकांची किंवा शालेय शिक्षकांची निपुणता दिसून येते. स्वतंत्र व्यक्तिमत्त्व विकास झाल्यानंतर विद्यार्थ्यांना वळण लावणं शक्य असतं; परंतु तसं करणं तुलनात्मक अवघड असते. त्या आधी लागलेलं वळण, विशेषतः वाईट वळण बदलण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. उदाहरणार्थ, शिस्तबद्ध वर्तनाचे फायदे, बेशिस्त वर्तनाचे तोटे पटवून देणं वगैरे. पालकांनी व शालेय शिक्षकांनी जर त्यांची जबाबदारी स्वीकारली आणि विद्यार्थ्यांना योग्य वेळी मार्गदर्शन केलं, तर त्याचा फायदा विद्यार्थ्यांसोबतच समाजालाही होतो.




**शुभेच्छांसह..!**

**– सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.